# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

<u>परिपत्रक क्र. २६</u>
१९९८-९९

क्र.झोपुप्रा/सचिव/परिपत्रक/७०९/९८
५वा मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
दिनांक : २४.१२.९८

## परिपत्रक

वषय : झोपडपट्टी पुनर्वसन योजना —
पात्र झोपडपट्टीधारकाने विकासकाबरोबर करावयाचा कराराचा मसुदा.

वृहन्मुंबईतील झोपडपट्टीवासीयांना स्वतःची स्वयंपूर्ण अशी २२५ चौरस फूट क्षेत्रफळाची सदनिका मोफत उपलब्ध होण्यासाठी शासनाने झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार केली आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत या योजनेची अंमलबजावणी व संनियंत्रण करण्यात येते. प्राधिकरणाकडे प्राप्त होणाऱ्या पुनर्वसन योजनांना प्राधिकरणाकडून मंजूरी प्रदान करण्यात येते. त्याशिवाय, अशी योजना तयार करण्यासाठी झोपडपट्टीवासीयांना, विकासकांना व सर्व संबंधितांना प्राधिकरणाकडून संपूर्ण मार्गदर्शन देण्यात येते.

झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करण्यासंबंधीच्या प्रक्रियेचा एक भाग म्हणून प्रथम झोपडपट्टीवासीयांनी एकत्र येऊन योजनेची पूर्वतयारी करणे आवश्यक आहे. त्याचवेळी प्रत्येक पात्र झोपडपट्टीधारकांने विकासकाबरोबर एक करार करणेही, योजनेच्या तरतुदीप्रमाणे, आवश्यक आहे. करार कसा असावा, या संबंधीच्या मार्गदर्शनासाठी बऱ्याच झोपडपट्टीधारकांनी सातत्याने विचारणा केली आहे. हे लक्षांत घेवून झोपडपट्टीधारक व विकासक यांचेमध्ये करावयाचा कराराचा मसुदा, प्राधिकरणाने शासनाच्या मान्यतेने, तयार केला आहे. हा मसुदा सर्व संबंधितांना सुलभतेने उपलब्ध व्हावा अशी प्राधिकरणाची भूमिका आहे. प्राधिकरणाने ह्या मसुद्याच्या प्रती प्रत्येकी रू. ५ एवढया अल्प किंमतीत, लेखा, विक्रीसाठी उपलब्ध आहे.

सही/
सचिव